# पवना सहकारी बँक लि., पुणे.

**मुख्य कार्यालय :** - एच-ब्लॉक, प्लॉट नं.टी-२०, पिंपरी औद्योगिक वसाहत, ऑटो क्लस्टर जवळ, चिंचवड, पुणे-४११०१९ फोन नं. ६७१७१६००/१/२/३

E-mail : pavanabank@gmail.com Web : www.pavanabank.com


## ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(फक्त सभासदांकरीता)**

पवना सहकारी बँक लि., पुणे या बँकेची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार, दि.२९/०९/२०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता, बँकेच्या मुख्य कार्यालयात व्हिडीओ कॉन्फरन्सिंग(VC) / ऑदर ऑडीओ व्हिज्युअल मीन्स (OAVM) व्दारे आयोजित केलेली आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी सदर सभेस ऑनलाईन अवश्य उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) दि.२५ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) मा.संचालक मंडळाने तयार केलेला ४८ वा वार्षिक अहवाल व दि.३१ मार्च, २०२१ चा ताळेबंद आणि सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे नफा-तोटा पत्रक स्विकृत करणे.
३) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवालाबाबत विचार करणे व स्विकृत करणे.
४) मा.संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२०-२१ च्या नफा वाटणीस मान्यता देणे.
५) मा.संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकाची माहिती घेणे.
६) मा.संचालक मंडळाने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता नेमलेल्या समावर्ती लेखापरीक्षकांची नेमणुक व त्यांचे मानधन त्यास मान्यता देणे.
७) सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणुक केलेबाबत माहिती घेणे.
८) बँकेच्या सेवक रचना आराखडयाची माहिती घेऊन त्यास मान्यता देणे.
९) बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पदी पुनर्नियुक्ती केलेबाबत माहिती घेणे.
१०) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती घेणे.
११) बँकेच्या सभासदांचे शिक्षण व प्रशिक्षण याकरिता बँकेने केलेल्या प्रयत्नांची नोंद घेणे.
१२) महाराष्ट्र शासनाच्या नागरी सहकारी बँकांसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना शासन निर्णय क्र.युआरबी/१८०७/प्र.क्र.४५९(ब)/७-स दि.१९/१०/२०१८ अंतर्गत दि.३१/०३/२०२१ पर्यंत तडजोड केलेल्या थकित कर्ज खात्यांच्या माहीतीची नोंद घेणे.
१३) ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस व्हिडीओ कॉन्फरन्सिंग(VC) / ऑदर ऑडीओ व्हिज्युअल मीन्स (OAVM) व्दारे उपस्थित राहु न शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत करणे.
१४) मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ : चिंचवड, पुणे.
दिनांक : १४/०९/२०२१

मा.संचालक मंडळाच्या आज्ञेवरुन
**मनेश बबन बोऱ्हाडे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

**विशेष सुचना :**

१) कोव्हीड-१९ विषाणुच्या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र राज्य शासन यांनी दि.३० जुलै, २०२१ रोजीच्या आदेशान्वये (क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क.२४/१३-स,) राज्यातील सहकारी संस्थांच्या वार्षिक सर्वसाधारण सभा ऑनलाईन घेण्याबाबत आदेश दिलेले आहेत. यानुसार सभा ऑनलाईन आयोजित केली आहे.
२) या सभेच्या वेळी गणपूर्ती न झाल्यास सभा अर्ध्या तासाकरीता तहकूब केली जाईल व सदरची सभा त्याच दिवशी सकाळी ११.०० वा. ऑनलाईन सुरु करण्यात येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
३) सर्व सभासदांनी आपले मोबाईल क्रमांक बँकेच्या शाखांमध्ये अथवा मुख्य कार्यालयात दि.१८/०९/२०२१ पर्यंत लेखी स्वरूपात दयावेत. ज्या सभासदांचे मोबाईल क्रमांक बँकेकडे आहेत त्यांनाच नोंदणीकरीता सदर सभेची लिंक पाठवता येईल व ते सभेमध्ये सहभागी होऊ शकतील याची कृपया नोंद घ्यावी.

मागे पहा..

४) दि.२४/०९/२०२१ रोजी पर्यंत ज्या सभासदांनी लिंकव्दारे नोंदणी केलेली आहे फक्त अशाच सभासदांना सभेची लिंक एसएमएस / ई-मेल द्वारे दि.२७/०९/२०२१ रोजी पाठविण्यात येईल. सभेपूर्वी १५ मिनिटे पुर्वी बँकेचे अधिकृत लिंकव्दारे सभेमध्ये सहभागी होऊ शकतील. (लिंकमध्ये मोबाईल क्रमांक टाकल्यानंतर सभेत ऑनलाईन सहभागी होता येईल.)

५) काही तांत्रिक कारणामुळे सदर सभेचे कामकाज खंडीत झाल्यास सदर त्रुटीचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंक वर त्याच दिवशी लगेच सभेचे कामकाज पुन्हा सुरू केले जाईल याची सभासदांनी नोंद घ्यावी.

६) कोणत्याही सभासदास त्यांच्या तांत्रिक अडचणीमुळे सभेत सहभागी होता आले नाही तर त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

७) सन २०२० -२१ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण झालेली हिशोब पत्रके ज्यामध्ये ताळेबंद व नफा-तोटा पत्रक आहेत, तसेच मा.संचालक मंडळाच्या अहवालाच्या प्रती ज्या सभासदांना हव्या असतील त्यांना बँकेच्या मुख्य कार्यालय व सर्व शाखांकडे कामकाजाच्या वेळेत संपर्क साधल्यास उपलब्ध करुन दिल्या जातील.

८) वरील नोटीशीमध्ये निर्देशित केलेल्या विषयासंबंधी आवश्यक ती कागदपत्रे व माहिती घ्यावयाची असल्यास किंवा यासंबंधी काही सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात दि.२०/०९/२०२१ पर्यंत मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत द्याव्यात.

९) सन २०१७-१८ या वर्षाचा लाभांश ज्या सभासदांनी अद्याप घेतला नसेल तर घेऊन जाण्याची व्यवस्था करावी अन्यथा सदर लाभांश रक्कम बँकेच्या पोटनियम क्र.५८(४) अन्वये बँकेच्या गंगाजळीत वर्ग करण्यात येणार आहे याची सभासदांनी नोंद घ्यावी.

१०) बँकेच्या सर्व सभासदांनी केवायसी (KYC) पूर्ण करून घ्यावी तसेच सभासदाने अद्ययावत निवास पत्ता व फोन क्रमांक शाखेत दयावेत.